दावा दाखल तारीख- १२/०३/२०२६
दावा फैसलावर तारीख- १२/०३/२०२६
दावा निकाल तारीख- १४/०३/२०२६

नियमित दिवाणी दावा ३९/२०२६

# तडजोड हुकुमनामा

रे.क.नं.३९/२०२६
नि. ११/अ

## मे.दिवाणी न्यायाधिशसो क.स्तर,पन्हाळा

यांचे कोर्टात...........

**१. जगन्नाथ भिमराव बच्चे**
व.व.४५,धंदा-शेती,
रा.सावर्डे तर्फ सातवे,
ता.पन्हाळा,जि.कोल्हापूर

**२. उषा मारुती पाटील**
व.व.४९,धंदा-घरकाम,
रा.लादेवाडी,ता.शिराळा,जि.सांगली

**३. रेखा विश्वास पाटील**
व.व.४४,धंदा-घरकाम,
रा.टोप,ता.हातकणंगले,जि.कोल्हापूर

**४. विलास रामू बच्चे**
व.व.७३,धंदा-शेती,
रा.सावर्डे तर्फ सातवे,
ता.पन्हाळा,जि.कोल्हापूर

**५. एकनाथ पांडुरंग बच्चे**
व.व.६०,धंदा-शेती,रा.सदर

**६. प्रकाश पांडुरंग बच्चे**
व.व.६३,धंदा-शेती,रा.सदर

**७. रंगराव पांडुरंग बच्चे**
व.व.७३,धंदा-शेती,रा.सदर

} **वादी**

**विरुद्ध**

| | | |
|---|---|---|
| **१. बाळाबाई उर्फ लक्ष्मीबाई रंगराव पाटील**<br>व.व.५७,धंदा-घरकाम,<br>रा.टोप,ता.हातकणंगले,जि.कोल्हापूर<br>**२. सजुबाई सर्जेराव मस्के**<br>व.व.७२,धंदा-घरकाम,<br>रा.मांगले,ता.शिराळा,जि.सांगली<br>**३. पुतळाबाई आण्णा वाकरे उर्फ चौगले (म.वा.)**<br>**अ. सुरेखा सदाशिव सावंत**<br>व.व.७०,धंदा-घरकाम,<br>रा.सातवे-सावर्डे,ता.पन्हाळा,जि.कोल्हापूर<br>**४. सुशिला मारुती पाटील**<br>व.व.७५,धंदा-घरकाम,<br>रा.टोप दक्षिणवाडी,ता.हातकणंगले,<br>जि.कोल्हापूर | } | **प्र.वादी** |

**हिंदु वारसा कायदा कलम ६ व ८ प्रमाणे.दावा मिळकतीचे सरस-निरस मानाने वाटणीचा, तुटक कब्जा व कायम मनाईसाठी.**
**कोर्ट फि साठी रु.१४१३/-**
**Hindu Succession Act Sec-6 & 8**

**यातील वादींचे नम्रपणे कळविणे की,**

**१) दावा मिळकतीचे वर्णन :-**

अ. मौजे सावर्डे तर्फ सातवे,ता.पन्हाळा,जि.कोल्हापूर खालीप्रमाणे शेतजमीनी.

| अ.नं. | भु.गट नं. | पो.ख.सह एकुण क्षेत्र हे-आर | आकार रु.-पैसे |
|---|---|---|---|
| १ | ५८३/अ | ३.२८.०० | ०३.९१ |

| | | | |
|---|---|---|---|
| २ | १०४ | ०.०४.०० | ००.४७ |
| ३ | ८२२/१ | १.३४.०० | ०१.२१ |
| ४ | ८२२/२ | ०.३६.०० | ००.५० |
| ५ | ८९१ | ०.६०.०० | ०७.८१ |
| ६ | ९०५ | ०.१३.०० | ०१.८१ |
| ७ | ८५९ | ०.१६.०० | ०१.६५ |
| ८ | १८९ | ०.२०.०० | ०२.३७ |
| ९ | ४६० | ०.१७.२० | ०२.६९ |
| १० | ५०१ | २.३९.०० | ११.९२ |
| ११ | ६४९ | ०.३९.०० | ०१.०० |
| १२ | ७६ | ०.५१.०० | ०४.२१ |
| १३ | ८२०/अ | ०.२१.०० | ०२.५५ |
| १४ | ८२०/ब | ०.०४.०० | ००.१२ |
| १५ | ८६१ | ०.१४.०० | ०१.३७ |
| १६ | ८६८ | ०.०४.०० | ००.५० |
| १७ | ८७० | ०.४१.०० | ०४.५८ |
| १८ | ५०० | ४.१८.१८ | १४.७४ |

**ब.** मौजे सावर्डे तर्फ सातवे,ता.पन्हाळा,जि.कोल्हापूर येथील न.भु.क्र.३२२ एकुण क्षेत्र ३३५.७ चौ.मी. यांसी चतु:सिमा :-

**पुर्वेस :-** प्रकाश निवृत्ती बच्चे यांची मिळकत.


**पश्चिमेस :-** नारायण बंडु बच्चे यांची मिळकत.

**दक्षिणेस :-** विश्वनाथ शंकर बच्चे वगैरे यांची मिळकत.

**उत्तरेस :-** न.भु.क्र.३०१ ची मिळकत.

येणेप्रमाणे वर्णनाच्या शेत मिळकती व घर मिळकती त्यामधील वादी व प्र.वादी यांचे पुर्व हक्कदार कृष्णा बच्चे यांचे नावे असलेली व त्यांची मृत्युनंतर वादी व प्र.वादी यांचे नावे नोंद असणारी शेत मिळकती व घर मिळकती याबाबत कायदेशीर हिंदु वारसा हक्काने येणार हिस्सा हा दाव्याचा विषय असुन त्यास येथुन पुढे **"दावा मिळकती"** अथवा **"सदर मिळकती"** असे संबोधणेत आलेले आहे.

२) <u>**वादी व प्र.वादी यांची दाव्यापुर्ती वंशावळ खालीलप्रमाणे :-**</u>




येणेप्रमाणे वादी व प्र.वादी यांची वंशावळ असे.

३) सदरची मिळकत ही वादी व प्र.वादी यांचे पुर्वहक्कदार कृष्णा बच्चे यांची वाडवडिलार्जित मिळकत होती व आहे.यातील वादी,प्र.वादी यांचे पुर्व हक्कदार

हे मयत झालेनंतर त्यांचे पश्चात रामू, पांडु, बापू व शंकर यांचे नावाची नोंद होती. तसेच यातील रामु बच्चे हे दि.१६/१०/१९९७ इ.रोजी मयत झालेनंतर वर कलम १अ मध्ये नमुद केलेल्या मिळकतीवरती भिमराव, विलास, पुतळाबाई व सजुबाई यांची फेरफार नं.१५५३ ने ७/१२ पत्रकी नोंद झालेली होती व आहे. तसेच यातील प्र.वादी नं.१ ते ३ यांचे नावाची नोंद वर कलम १अ मध्ये नमुद कलेल्या मिळकतीच्या ७/१२ पत्रकी इतर हक्कामध्ये नोंद झालेली आहे. तदनंतर यातील भिमराव रामू बच्चे हे दि.२४/१०/२०१३ इ.रोजी मयत झालेनंतर त्यांचे पश्चात वादी यांच्या नावाची नोंद फेरफार नं.२७४० ने वर कलम १अ मध्ये नमुद केलेल्या मिळकतीच्या ७/१२ पत्रकी नोंद झालेली आहे.तसेच यातील पांडुरंग कृष्णा बच्चे हे दि.२१/०९/२००४ इ.रोजी मयत झालेनंतर त्यांचे पश्चात वादी नं.५ ते ७ व प्र.वादी नं.४ यांचे नावाची नोंद फेरफार नं.१९१४ ने वर कलम १अ मध्ये नमुद केलेल्या मिळकतीच्या ७/१२ पत्रकी नोंद झालेल आहे. त्यानुसार वादी व प्र.वादी व त्यांचे चुलते व भाऊ यांची दावा मिळकती मध्ये समाईकात कब्जे व वहिवाट होती व आहे. तसेच दावा अर्जी कलम १अ व १ब मध्ये नमुद केलेल्या मिळकतीमध्ये वादी व प्र.वादी व त्यांचे चुलते व भाऊ यांचेमध्ये सदर दावा मिळकतीबाबत अदयापही सरस-निरस मानाने वाटप झालेले नाही.

४) दावा मिळकतीमध्ये प्रस्तुत वादी नं.१ ते ४ यांचे पुर्वहक्कदार रामू बच्चे यांचे हिस्सेमध्ये हिंदु वारसा कायदयातील तरतुदीप्रमाणे १/४ हिस्सा तसेच वादी नं.५ ते ७ यांचा पांडुरंग बच्चे यांचे हिस्सेमध्ये हिंदु वारसा कायदयातील तरतुदी प्रमाणे १/४ हिस्सा असुन तो बेकायदेशीरपणे डावलणेच्या हेतुने दावा

मिळकतीचे प्रस्तुत वादी व प्र.वादी यांचेमध्ये आजतागायत सरस-निरस मानाने तुटक असे वाटप झालेले नसताना दावा मिळकती हया वादीचे अपरोक्ष अन्य त्रयस्थ इसमांना तबदिल,हस्तांतरण व विक्री करणेचा खटाटोप प्र.वादी यांनी चालविलेला आहे.सदरचे प्र.वादी यांचे कृत्य हे बेकायदेशीर, अप्रामाणिकपणाचे तसेच दावा मिळकतीमधील वादीचा असणारा कायदेशीर हिस्सा डावलणारे असे आहे.

५) सदर मिळकतीमध्ये वादी यांचा हिंदु वारसा कायदयातील तरतुदीप्रमाणे १/४ हिस्सा असुन यातील वादी यांचे पुर्वहक्कदार यांच्या मृत्युनंतर वादी व प्र.वादी यांचे दरम्यान दावा मिळकतीबाबत आजतागायत सरस-निरस मानाने वाटप झालेले नाही.दावा मिळकतीमध्ये वादी व प्र.वादी यांची सामाईक कब्जेवहिवाट होती व आहे.

६) यातील वादी यांनी दावा मिळकतीचे सरस निरस मानाने वाटप होवुन मिळणेकरीता व तुटक कब्जा मिळणेकरीता ता.१०/०१/२०२६ इ.रोजी प्र.वादी यांचेकडे मागणी केली असता प्र.वादी यांनी वादीना सदर मिळकतीचे वाटप "आज करु उद्या करु" असे सांगुन चालढकल करु लागले आहेत.

७) तदनंतर वादी यांनी वारंवार प्र.वादी यांच्याकडे दावा मिळकतीचे सरस-निरस मानाने वाटप करुन मागितले असता प्र.वादी यांनी वादी यांना दावा मिळकतीशी "तुझा काही संबंध नाही,तुला काय करायचे ते कर" असे सांगितले.सदर प्र.वादी यांचे कृत्य संपुर्णत: बेकायदेशीर-पणाचे,अनाधिकाराचे नैसर्गिक न्यायतत्वा विरुद्ध व हिंदु वारसा कायदयातील तरतुदीविरुद्धचे असे आहे.

८) वास्तविक यातील वादी यांचा दावा मिळकतीमध्ये हिंदु वारसा कायदयातील तरतुदीप्रमाणे १/४ हिस्सा होता व आहे.तथापि यातील वादी व प्र.वादी यांच्यामध्ये कायदयातील तरतुदीप्रमाणे त्यांच्या वाटपाला येणाऱ्या हिस्सेचे सरस-निरस मानाने तुटक वाटप व त्याचा पृथक कब्जा वादी व प्र.वादी यांना मिळालेला नाही.वादींनी प्र.वादी यांचेकडे दावा मिळकतीचे सरस-निरस मानाने तुटक वाटप करुन देणेची मागणी करुन देखील प्र.वादी यांनी वादींना कायदेशीर हिस्सा देणेस टाळाटाळ केलेली होती व आहे.सदर प्रमाणे वादी यांचा सदर मिळकतीमधील कायदेशीर हिस्सा टाळाटाळ करणेचा प्रस्तुत प्र.वादी यांना कोणताही कायदेशीर हक्क व अधिकार नव्हता व नाही.

९) वरीलप्रमाणे वस्तुस्थिती असताना वादीनी ता.२३/०२/२०२६ इ.रोजी मध्ये प्र.वादी यांच्याकडे दावा मिळकतीचे सरस निरसमानाने वाटप होवुन मिळणेसाठी मागणी केली असता प्र.वादी यांनी वादींना त्यांचा असणारा कायदेशीर हिस्सा देणेचे स्पष्ट शब्दात नाकारले व वादी यांचा दावा मिळकतीमध्ये असलेला कायदेशीर अविभक्त १/४ हिस्सा बेकायदेशीरपणे गिळंकृत /हडप करणेच्या उद्देशाने प्र.वादी यांनी संगनमताने दावा मिळकती त्रयस्थ इसमांना विक्री करणेचा प्रयत्न चालवला आहे.त्यामुळे वादी यांना सदरचा वाटपाचा दावा दाखल करणेस भाग पडले आहे.

**१०) <u>दावेस कारण</u> :-**

वादी यांनी दावा मिळकतीचे सरस निरस मानाने वाटप होवुन मिळणेकरीता व तुटक कब्जा मिळणेकरीता ता.१०/०१/२०२६ इ.रोजी प्र.वादी यांचेकडे मागणी केली असता प्र.वादी यांनी वादीना सदर मिळकतीचे वाटप "आज करु

उद्या करु" असे सांगुन चालढकल करु लागले आहेत तेव्हा व तदनंतर वादीनी ता.२३/०२/२०२६ इ.रोजी मध्ये प्र.वादी यांच्याकडे दावा मिळकतीचे सरस निरसमानाने वाटप होवुन मिळणेसाठी मागणी केली असता प्र.वादी यांनी वादींना त्यांचा असणारा कायदेशीर हिस्सा देणेचे स्पष्ट शब्दात नाकारले वेळोवेळी प्रस्तुत दावेस कारण घडले व घडत आहे.

११) दावा अर्जी कलम १अ व १ब मध्ये नमुद केलेल्या मिळकतीमध्ये वादी व प्र.वादी यांचा हिंदु वारसा कायदयातील तरतुदीप्रमाणे येणाऱ्या हिस्सेकरीता सदरचा वाटपाचा दावा दाखल केलेला आहे.

१२) दावा अर्जी कलम १अ व १ब मध्ये नमुद केलेल्या मिळकतीमधील अन्य क्षेत्र सहहिस्सेदार यांचे स्वतंत्रपणे कब्जात आहे.त्यामुळे सदर गटनंबरमधील सह हिस्सेदार यांचे विरुद्ध प्रस्तुत दाव्यामध्ये कोणतीही मागणी केली नसलेने त्यांना या कामी पक्षकार केलेले नाही.

**१३) <u>दावेचा तपशिल व आकारणी</u> :-**

| **रक्कम रु.** | |
|---|---|
| **१४१३/-** | दावा अर्जी कलम १अ मध्ये नमुद केलेल्या मिळकतीचा एकुण आकार २८.२७ रु. होत असुन त्याचे ८० पट आकारणी २२६१.६ कोर्ट फि साठी २०० पट किंमत ५६५४/- अधिकारासाठी केलेली असुन वादीचे १/४ हिस्सेची किंमत आकारणी सदरी दाखल. |
| **रु. १४१३/-** | **एकुण रक्कम** |

**१४) <u>दावेची आकारणी</u> :-**

कोर्ट फिसाठी या दावेची आकारणी रु.१४१३/- पैसे केली असुन त्यावर महाराष्ट्र कोर्ट फि कायदा १९५९ मधील कलम ६ (iv)(vi)(j) आर्टीकल २३(f) प्रमाणे कोर्ट फी स्टॅम्प लावला आहे.

१५) यातील वादी,प्र.वादी व दावा मिळकती ह्या या मे.कोर्टाच्या स्थलसिमेत येत असलेने सदरचा दावा मे.कोर्टात चालवणेचा या मे.कोर्टास पुर्ण हक्क व अधिकार आहे.

१६) प्रस्तुतचा दावा मुदतीत आहे.यातील वादी व प्र.वादी यांचे दरम्यान दावा मिळकतीबाबत या व अन्य कोणत्याही मे.कोर्टात वाद प्रलंबित नाही.तसेच दावा मिळकती संदर्भात प्र.वादी यांचेकडुन वादींना कॅव्हेटची नोटीस नाही.

**१७) <u>सबब,वादीची विनंती की,</u>**

अ. वादीचा दावा मंजुर करणेत यावा.

ब. दावा मिळकतीचे सरस-निरस मानाने वाटप होवुन वादींचा १/४ अगर कायदयाने येणारा हिस्सा तुटक असा होवुन त्याचा पृथक कब्जा वादींना देवविणेबाबत आदेश होवुन मिळावा व तसा ठराव व हुकूमनामा व्हावा.

क. दावा मिळकत ही शेतजमीन असलेने तिचे मे.जिल्हाधिकारीसो यांचे मार्फत वाटप करणेबाबत आदेश व्हावा.

ड. सदर दावेचा वादीचा कोर्ट खर्च प्र.वादी यांचेकडुन वसुल होवुन मिळावा.

इ. जरुर तर दावा दुरुस्तीस परवानगी व संधी असावी.

आज दि.१४/०३/२०२६ इ.रोजी राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये मा.श्रीमती एस.व्ही.जंगमस्वामी,पॅनेल प्रमुख तथा दिवाणी न्यायाधिशसो,क.स्तर पन्हाळा यांचेसमोर तसेच वादी व तर्फे वकील डी.एम.पाटील व प्र.वादी व तर्फे वकील ए.बी.पाटील यांचे समक्ष नि.९ वरील तडजोड पुरसीस नुसार सदरचा दावा तडजोडीने अंतिम निकालात निघाला.

**<u>यातील वादी व प्र.वादी यांची तडजोड पुरसीस पुढीलप्रमाणे :-</u>**

१) यातील वादी यांनी प्रस्तुतचा दावा प्र.वादी विरुद्ध दावा मिळकतीचे सरस निरस मानाने वाटप होवुन मिळणेकरीता व कायम मनाईकरीता दाखल केलेला आहे.

२) **दावा मिळकतीचे वर्णन :-**

आ.मौजे सावर्डे तर्फ सातवे,ता.पन्हाळा,जि.कोल्हापूर खालीप्रमाणे शेतजमीनी.

| अ.नं. | भु.गट नं. | पो.ख.सह एकुण क्षेत्र हे-आर | आकार रु.-पैसे |
|---|---|---|---|
| १ | ५८३/अ | ३.२८.०० | ०३.९१ |
| २ | १०४ | ०.०४.०० | ००.४७ |
| ३ | ८२२/१ | १.३४.०० | ०१.२१ |
| ४ | ८२२/२ | ०.३६.०० | ००.५० |
| ५ | ८९१ | ०.६०.०० | ०७.८१ |
| ६ | ९०५ | ०.१३.०० | ०१.८१ |
| ७ | ८५९ | ०.१६.०० | ०१.६५ |

| | | | |
|---|---|---|---|
| ८ | १८९ | ०.२०.०० | ०२.३७ |
| ९ | ४६० | ०.१७.२० | ०२.६९ |
| १० | ५०१ | २.३९.०० | ११.९२ |
| ११ | ६४९ | ०.३९.०० | ०१.०० |
| १२ | ७६ | ०.५१.०० | ०४.२१ |
| १३ | ८२०/अ | ०.२१.०० | ०२.५५ |
| १४ | ८२०/ब | ०.०४.०० | ००.१२ |
| १५ | ८६१ | ०.१४.०० | ०१.३७ |
| १६ | ८६८ | ०.०४.०० | ००.५० |
| १७ | ८७० | ०.४१.०० | ०४.५८ |
| १८ | ५०० | ४.१८.१८ | १४.७४ |

**ब.** मौजे सावर्डे तर्फ सातवे,ता.पन्हाळा,जि.कोल्हापूर येथील न.भु.क्र.३२२ एकुण क्षेत्र ३३५.७ चौ.मी. यांसी चतु:सिमा :-

**पुर्वेस :-** प्रकाश निवृत्ती बच्चे यांची मिळकत.

**पश्चिमेस :-** नारायण बंडु बच्चे यांची मिळकत.

**दक्षिणेस :-** विश्वनाथ शंकर बच्चे वगैरे यांची मिळकत.

**उत्तरेस :-** न.भु.क्र.३०१ ची मिळकत..

तथापी वर नमुद दावा मिळकतीचे अनुषंगाने यातील वादी व प्र.वादी यांचेमध्ये राष्ट्रीय लोक अदालत मध्ये ता.१४/०३/२०२६ इ.रोजी कोर्टामध्ये

आपआपसात तडजोड झालेली असुन वाटपा संबंधी असणारा वाद पुर्णपणे मिटला आहे. त्याच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे :-

३) सदरची मिळकत ही वादी व प्र.वादी यांचे पुर्वहक्कदार कृष्णा बच्चे यांची वाडवडिलार्जित मिळकत होती व आहे.यातील वादी,प्र.वादी यांचे पुर्व हक्कदार हे मयत झालेनंतर त्यांचे पश्चात रामू, पांडु, बापू व शंकर यांचे नावाची नोंद होती. तसेच यातील रामु बच्चे हे दि.१६/१०/१९९७ इ.रोजी मयत झालेनंतर वर कलम १अ मध्ये नमुद केलेल्या मिळकतीवरती भिमराव, विलास, पुतळाबाई व सजुबाई यांची फेरफार नं.१५५३ ने ७/१२ पत्रकी नोंद झालेली होती व आहे. तसेच यातील प्र.वादी नं.१ ते ३ यांचे नावाची नोंद वर कलम २अ मध्ये नमुद कलेल्या मिळकतीच्या ७/१२ पत्रकी इतर हक्कामध्ये नोंद झालेली आहे. तदनंतर यातील भिमराव रामू बच्चे हे दि.२४/१०/२०१३ इ.रोजी मयत झालेनंतर त्यांचे पश्चात वादी यांच्या नावाची नोंद फेरफार नं.२७४० ने वर कलम २अ मध्ये नमुद केलेल्या मिळकतीच्या ७/१२ पत्रकी नोंद झालेली आहे.तसेच यातील पांडुरंग कृष्णा बच्चे हे दि.२१/०९/२००४ इ.रोजी मयत झालेनंतर त्यांचे पश्चात वादी नं.५ ते ७ व प्र.वादी नं.४ यांचे नावाची नोंद फेरफार नं.१९१४ ने वर कलम २अ मध्ये नमुद केलेल्या मिळकतीच्या ७/१२ पत्रकी नोंद झालेली आहे. त्यानुसार वादी व प्र.वादी व त्यांचे चुलते व भाऊ यांची दावा मिळकती मध्ये समाईकात कब्जे व वहिवाट होती व आहे. तसेच दावा अर्जी कलम २अ व २ब मध्ये नमुद केलेल्या मिळकतीमध्ये वादी व प्र.वादी व त्यांचे चुलते व भाऊ

यांचेमध्ये सदर दावा मिळकतीबाबत अदयापही सरस-निरस मानाने वाटप झालेले नाही.

४) तथापी यातील वादी व प्र.वादी यांची वर कलम २अ मध्ये नमुद केलेल्या दावा मिळकतीच्या ७/१२ पत्रकी समाईकात नावाची नोंद झालेली आहे.तथापी आजरोजी यातील वादी व प्र.वादी यांचेमध्ये झालेल्या तडजोडीप्रमाणे प्र.वादी नं.१ बाळाबाई उर्फ लक्ष्मीबाई रंगराव पाटील, प्र.वादी नं.२ सजुबाई सर्जेराव मस्के, प्र.वादी नं.३ पुतळाबाई आण्णा वाकरे उर्फ चौगले मयत वारस ३अ.सुरेखा सदाशिव सावंत यांनी वर कलम २अ दावा मिळकती मधील क्षेत्र हिंदु वारसा कायदयातील तरतुदीप्रमाणे त्यांचा हिस्सा कायमपणे वादी नं.१ जगन्नाथ भिमराव बच्चे, वादी नं.२ उषा मारुती पाटील, वादी नं.३ रेखा विश्वास पाटील व वादी नं.४ विलास रामू बच्चे यांचे हक्कात कायमपणे सोडुन दिलेला आहे. त्यामुळे वर कलम २अ मध्ये नमुद केलेल्या मिळकतीच्या ७/१२ पत्रकी इतर हक्कामध्ये प्र.वादी नं.१ ते ३ यांचे नावाची नोंद कमी होणेस त्यांची कोणतीही तक्रार अथवा हरकत नाही.त्याबाबत प्र.वादी नं.१ ते ३ यांची मुक्त संमत्ती आहे. त्याबाबत त्यांची कोणतीही तक्रार अथवा हरकत नाही.

तसेच वादी व प्र.वादी यांचेमध्ये झालेल्या तडजोडीप्रमाणे प्र.वादी नं.४ सुशिला मारुती पाटील यांनी वर कलम २अ दावा मिळकती मधील क्षेत्र हिंदु वारसा कायदयातील तरतुदीप्रमाणे त्यांचा हिस्सा कायमपणे वादी नं.४ एकनाथ पांडुरंग बच्चे, वादी नं.५ प्रकाश पांडुरंग बच्चे, वादी नं.६ रंगराव पांडुरंग बच्चे यांचे हक्कात कायमपणे सोडुन दिलेला आहे. त्यामुळे वर कलम २अ मध्ये नमुद

केलेल्या मिळकतीच्या ७/१२ पत्रकी इतर हक्कामध्ये प्र.वादी नं.४ यांचे नावाची नोंद कमी होणेस त्यांची कोणतीही तक्रार अथवा हरकत नाही.त्याबाबत प्र.वादी नं.४ यांची मुक्त संमत्ती आहे. त्याबाबत त्यांची कोणतीही तक्रार अथवा हरकत नाही.

५) वर कलम २ब मध्ये नमुद केलेल्या मिळकतीमध्ये प्र.वादी नं.१ बाळाबाई उर्फ लक्ष्मीबाई रंगराव पाटील, प्र.वादी नं.२ सजुबाई सर्जेराव मस्के, प्र.वादी नं.३ पुतळाबाई आण्णा वाकरे उर्फ चौगले मयत वारस ३अ.सुरेखा सदाशिव सावंत यांनी वर कलम २अ दावा मिळकती मधील क्षेत्र हिंदु वारसा कायदयातील तरतुदीप्रमाणे त्यांचा हिस्सा कायमपणे वादी नं.१ जगन्नाथ भिमराव बच्चे, वादी नं.२ उषा मारुती पाटील, वादी नं.३ रेखा विश्वास पाटील व वादी नं.४ विलास रामू बच्चे यांचे हक्कात कायमपणे सोडुन दिलेला आहे.त्यास त्यांची मुक्तपणे संमत्ती आहे.

तसेच प्र.वादी नं.४ सुशिला मारुती पाटील यांनी वर कलम २अ दावा मिळकती मधील क्षेत्र हिंदु वारसा कायदयातील तरतुदीप्रमाणे त्यांचा हिस्सा कायमपणे वादी नं.४ एकनाथ पांडुरंग बच्चे, वादी नं.५ प्रकाश पांडुरंग बच्चे, वादी नं.६ रंगराव पांडुरंग बच्चे यांचे हक्कात कायमपणे सोडुन दिलेला आहे.त्यास त्यांची मुक्तपणे संमत्ती आहे.

६) येणेप्रमाणे तडजोड पुरसीस आधारे वरीलप्रमाणे मिळकतीस मे.मंडळ अधिकारीसो व मे.तलाठीसो अथवा संबंधीत शासकीय तसेच निमशासकीय ऑफिस मधुन आपआपल्या नावाची वर नमुद केलेप्रमाणे मिळकतस नोंद करुन

घेणेची आहे. तसेच तडजोडी नुसार मा.उप अधिक्षक भुमी अभिलेख पन्हाळा यांनी प्र.वादी यांच्या नावाची नोंद करुन घेणेची आहे.

७) सदरप्रमाणे नाव नोंद करणेस उभयंतांची हकरत अगर तक्रार नाही.भविष्यात कोणीही,कोणत्याही प्रकारची एकमेकांस हरकत अगर अडथळा,तक्रार करणेची नाही.प्रस्तुत मिळकतीमध्ये उभयंतांची एकमेकांचे हिस्सेत येथुनपुढे काही संबंध हक्क,दावा,वाद,चार्ज,पोटगी व अग्रहक्क वगैरे सर्व कायदेशीर बाबी राहिलेल्या नाहीत.भविष्यात एकमेकांचे वारसांची एकमेकांच्या हक्कात कोणतीही हरकत अगर तक्रार असणार नाही.हे उभयंताना मान्य व कबुल आहे.

८) वर नमुद केलेप्रमाणे ज्याचे-त्याचे हिस्सेने यातील वादी व प्र.वादी यांनी निरंतर कायमस्वरुपी मालकी हक्काने सदर मिळकत उपभोगणेची आहे.अथवा गरज पडलेस तबदीलीच्या मार्गाने तबदील करणेची आहे.तसेच ज्याचे-त्याचे हिस्सेप्रमाणे गरज पडलेस वित्तीय संस्थेचा कर्जबोजा निर्माण करणेस उभयंतांची हरकत अगर तक्रार असणार नाही.

९) ज्याचे-त्याचे हिस्सेस येणे-जाणेकरीता रस्ता आहे.त्याबाबत उभयंताचा वाद नाही.भविष्यात रत्याबाबत उभयंतानी वाद निर्माण करणेचा नाही.

१०) सदरची तडजोड पुरसीस वादी व प्र.वादी यांचेमध्ये आपसात झालेली आहे. सदरची पुरसीस वादी व प्र.वादी यांचेवर व त्यांचे वाली वारस यांचेवर लागु व बंधनकारक आहे.

११) सदर दाव्याचा खर्च ज्याचा-त्याचा-ज्याचा-त्याने सोसणेचा आहे.

# खर्चाचा आकडा

नियमीत दिवाणी दावा नं. ३९/२०२६ मधील नि.११/अ सोबत

| अ.नं. | तपशिल | वादी | प्रतिवादी क्र.१ ते ४ |
|---|---|---|---|
| १ | दावा अर्जास मुद्रांक | ३०० | -- |
| २ | वकील पत्रास मुद्रांक | १० | १० |
| ३ | वकील फी | ३०० | ३०० |
| ४ | दाखल केलेल्या कागदास मुद्रांक | १० | -- |
| ५ | आदेशिका लागू करणेस मुद्रांक | -- | -- |
| ६ | मुदत अर्जास स्टॅम्प | -- | -- |
| ७ | मनाई अर्जास स्टॅम्प | -- | -- |
| ८ | कमिशनरची फी | -- | -- |
| ९ | साक्षीदारास भत्ता | -- | -- |
| १० | इतर अर्जास स्टॅम्प | -- | -- |
| | एकूण ... | ६२० | ३१० |
| | वजा न दिलेला खर्च | | |
| १ | मुदत अर्जास स्टॅम्प | -- | -- |
| २ | कोर्ट फी परतावा | ३०० | -- |
| | एकूण ..... | ३२० | ३१० |

आज दिनांक १४ माहे मार्च सन २०२६ इसवी रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिला असे.

क. लिपिक

( एस.व्ही.जंगमस्वामी.)
पॅनेल प्रमुख, राष्ट्रीय लोकन्यायालय ,
दिवाणी न्यायाधीश क. स्तर पन्हाळा

वादी तर्फे वकील – दिपक महादेव पाटील
प्रतिवादी तर्फे वकिल – ए.बी.पाटील

टीप - या वादातील पक्षकारांना अशी ताकीद देण्यात येते की, त्यांनी हजर केलेले कोणतेही दस्तऐवज जर ते परत नेले नाहीत तर अपील झाले असल्यास अपिलाचा निकाल झाल्यावर नाश करुन टाकण्यास पात्र ठरतील)